महाराष्ट्र शासन

# उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज यांचे कार्यालय

शामराव बंडोजी पाटील दुय्यम बाजार आवार स्टेट बँकेच्या मागे, मार्केट यार्ड, मिरज
फोन नं. 0233-2223118
Email- drcsmiraj@rediffmail.com

२९८६

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ अन्वये आदेश

जाक्र/उनिमि/ श्री विजय सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हैसाळ /सन२०१८ दिनांक – १६/१/२०१८

**वाचले क्र** .१ . महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ

२. सचिव, श्री विजय सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हैसाळ यांचे दि.२७/११/२०१७ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेले पत्र.

प्रस्तावना -

ज्याअर्थी श्री विजय सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हैसाळ (यापुढे संस्था असा उल्लेख करणेत येईल)ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करणेत आलेली सहकारी संस्था असुन संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कायदा ,नियम १९६१ व संस्था उपविधीनुसार चालविणे संस्थेच्या संचालक मंडळावर बंधनकारक आहे. आणि

ज्याअर्थी, श्री विजय सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हैसाळ ही संस्था बंद आढळून आल्यामुळे या कार्यालयाकडील दि. ३१/८/२०१५ रोजीचे मध्यंतरीय आदेशान्वये अवसायनात घेणेत आली होती. त्यास अनुसरून संस्थेने कोणताही समाधानकारक लेखी खुलासा सादर न केल्यामुळे या कार्यालयाकडील दि.४.३.२०१६ रोजीचे अंतिम आदेशाद्वारे संस्था अवसायनात घेणेत आली होती. या कार्यालयाकडील दि. ४.३.२०१६ रोजीचे आदेशाविरूध्द संस्थेने मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांचेकडे अपिल दाखल केले होते.

ज्याअर्थी, मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांनी दि.३/५/२०१७ रोजीचे आदेशान्वये संस्थेचा अंतिम अवसायन आदेश रद्द केला आहे व मध्यंतरीय आदेशाबाबत फेरसुनावणी घेवून गुणदोषांवर निर्णय घेणेत यावा असे सूचित केले आहे.

ज्याअर्थी, मा.विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांच्या आदेशास अनुसरून या कार्यालयात सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीवेळी बाबू सत्तू मक्वान्नावर यांचेवतीने ॲड आर.एस.कांबळे व ॲड केळकर यांचे वकीलपत्र दाखल केले. सुनावणीवेळी ॲड आर.एस.कांबळे व ॲड केळकर उपस्थित राहिले.त्यांनी संस्थेच्या जागेसंदर्भात सभासदांचे उच्च न्यायालय येथे दावे चालू असलेमुळे संस्था पूर्ववत चालू ठेवावी अशी विनंती केली. व त्यांनी मा.उच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या दाव्यांच्या छायांकित प्रती सादर केल्या. सुनावणी तारखेस उक्त संस्थेच्या वतीने ॲड आर.एस.कांबळे व ॲड केळकर यांनी सादर केलेली कागदपत्रे पहाता उक्त संस्थेचे जागेसंदर्भात सभासदांचे उच्च न्यायालय येथे दावे चालू असलेमुळे संस्था सभासदांच्या हिताची जपवणुक करणेच्या दृष्टीने उक्त संस्थेचा मध्यंतरीय अवसायन आदेश मागे घेणेत आला.व संस्थेस निवडणूक घेणेच्या दृष्टीने कार्यवाही करणेबाबत व लेखापरीक्षण पूर्ण करून घेणेबाबत कार्यवाही करणेस सूचित केले होते.

ज्याअर्थी उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये सेक्रेटरी यांनी संस्थेचे दप्तर हिराबाई वसंत वंजीरे व बाबासाहेब पांडूरंग देसाई यांचे ताब्यात असल्यामुळे लेखापरीक्षण पूर्ण करून घेणे अडचणीचे झाले आहे असे कळविले आहे व लेखापरीक्षण पूर्ण करून घेणेकामी संस्थेचे दप्तर ताब्यात मिळणेसाठी या कार्यालयातील कर्मचारी यांची नियुक्ती करून संस्थेचे दप्तर ताब्यात मिळवून देणेत यावे अशी विनंती केली आहे. सदर अर्जाचा विचार करणेत येवून तसेच संस्थेची निवडणूक प्रक्रिया निर्विवादपणे पार पडणेसाठी संस्थेची मतदार यादी महाराष्ट्र सहकारी संस्था समिती निवडणूक नियम २०१४ नुसार तयार करणेकामी संस्थेच्या दप्तराबाबत कार्यवाही करणेसाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

Scanned by CamScanner

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी डॉ.प्र.अ.बागल उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज , श्री विजय सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हैसाळ या संस्थेचे कामकाज पाहणेसाठी श्री अरूण जे पाटील,अप्पर उपलेखापरीक्षक,सहकारी संस्था, कवठेमहांकाळ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी ६ महिन्यांचा असून त्यांनी त्वरित दप्तरी चार्ज घेवून तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक १६/१/२०१८ रोजी माझी सही व कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

ठिकाण- मिरज

( डॉ.प्र.अ.बागल )
उपनिबंधक
सहकारी संस्था,मिरज

प्रति,

१) सचिव, श्री विजय सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.म्हैसाळ
२/- संस्थेचे सर्व दप्तर प्राधिकृत अधिकारी यांचे ताब्यात देऊन केले कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री अरूण जे पाटील,अप्पर उपलेखापरीक्षक,सहकारी संस्था, कवठेमहांकाळ तथा प्राधिकृत अधिकारी यांना कळविणेत येते की,आपण संस्थेच्या दप्तराचा ताबा घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) शाखाधिकारी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था सांगली शाखा - म्हैसाळ

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,सांगली
२) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था सांगली

उपनिबंधक
सहकारी संस्था,मिरज

Scanned by CamScanner